प्रेसनोट दिनाक – १०/०७/२०१९

## सराईत वाहनचोर जेरबंद तीन लाख रुपये किंमतीच्या बारा दुचाकी जप्त बारा गुन्हे उघड

मा. डॉ के. व्यंकटेशम् पोलीस आयुक्त पुणे शहर यांनी पुणे शहर परिसरात वाहनचोरीच्या गुन्हयात वाढ झाल्याने त्यास प्रतिबंध व्हावा व वाहनचोरीच्या गुन्हयात वाढ होवु नये म्हणुन पोलीस अभिलेखावरील वाहनचोरी करणारे गुन्हेगार यांचे हालचालीवर लक्ष ठेवुन त्यांचेविरुध्द कडक व ठोस कारवाई करण्याबाबत पोलीस अधिकारी यांना वेळोवेळी आदेश दिलेले आहेत.

श्री. अमोल पांडुरंग सुपुगडे वय - २८ रा – गजरुक्मीणी अपार्टमेंट शिंदे पुलाजवळ शिवणे पुणे यांनी हिरो होंडा सी डी डिलक्स मोटार सायकल नंबर एमएच०६/सीएल८४१८ दिनांक – ०५/१२/२०१८ रोजी २२/३० ते दिनांक – ०६/१२/२०१८ रोजी सकाळी ०५/०० वा चे दरम्यान राहते घरासमोर कुलुप लावुन पार्क केली असताना ती अज्ञात चोरट्याने चोरुन नेली आहे त्याबाबत त्यांनी वारजे माळवाडी पोलीस स्टेशन पुणे येथे तक्रार दिलेली आहे. सदरबाबत गुरनं - ४८७/२०१८ भा. दं. वि. कलम ३७९ प्रमाणे गुन्हा दाखल आहेत.

गुन्हे शाखा युनिट – ३ पुणे शहर चे पोलीस अधिकारी व कर्मचारी वाहनचोरीचे गुन्हयाचा समांतर तपास करत असताना सहायक पोलीस उपनिरीक्षक दिपक मते व पोहवा रोहीदास लवांडे यांना त्यांचे गुप्त बातमीदाराकडुन माहीती मिळाली की वाहनचोरीचे गुन्हे करणारा सराईत गुन्हेगार रविंद्र कानडे हा मुळा रोड भैय्यावाडी खडकी पुणे याठिकाणी येणार आहे. अशी माहीती मिळाल्यावरुन पोलीसांनी त्याठिकाणी सापळा लावुन सराईत वाहनचोर रविंद्र सखाहरी कानडे वय-३८ रा - भुपो – कोल्हार ता - राहुरी जिल्हा - अहमदनगर पुणे यास पकडले आहे. पोलीसांनी त्यास विश्वासात घेवुन त्याचेकडे सखोल तपास केला असता त्याने पुणे शहरात तसेच पुणे शहर, पिंपरी व संगमनेर, अहमदनगर या परिसरात वाहनचोरीचे अनेक गुन्हे केल्याचे सांगीतले आहे. त्याचे ताब्यातुन फिर्यादी यांचे चोरलेल्या मोटार सायकलसह सहा हिरो होंडा स्प्लेंडर, तीन हिरो होंडा पॅशन, एक बजाज पल्सर, एक होंडा शाईन अशा एकुण बारा मोटार सायकली किंमत रुपये तीन लाखाच्या जप्त करण्यात आलेल्या आहे व वारजे माळवाडी दोन, सहकार नगर दोन, खडक , अलंकार, कोथरुड, पिंपरी कडील एक , संगमनेर कडील दोन, अकोले कडील एक व लोणी अहमदनगर कडील एक असे बारा गुन्हे उघडकीस आलेले आहे.

मा. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी न्यायालय क्रमांक – ३ पुणे शहर यांचे न्यायालयात आरोपीस हजर केले असता त्यांनी आरोपीस दिनांक - १४/०७/२०१९ रोजी पर्यत पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश दिलेले आहेत. आरोपी सराईत वाहनचोर आहे. त्याचेविरुध्द यापुर्वी निगडी पोलीस स्टेशन पुणे येथे दोन, पिंपरी, भोसरी, चतुःश्रृंगी पोलीस स्टेशन येथे एक, संगमनेर पोलीस स्टेशन येथे दोन, राहुरी पोलीस स्टेशन येथे एक , लोणी अहमदनगर पोलीस स्टेशन येथे सहा असे एकुण चौदा गुन्हे दाखल आहेत.

सदर कामगिरी गुन्हे शाखा, पुणे शहरचे अपर पोलीस आयुक्त श्री. अशोक मोराळे, पोलीस उप आयुक्त, गुन्हे पुणे शहर श्री. शिरीष सरदेशपांडे, सहायक पोलीस आयुक्त गुन्हे - १ पुणे श्री. समीर शेख यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा युनिट - ३ चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. राजेंद्र मोकाशी, पोलीस उप निरी श्री. किरण अडागळे, संजय गायकवाड, राजकुमार केंद्रे व गुन्हे शाखा युनिट ३ मधील पोलीस कर्मचारी सपोफौ दिपक मते, रोहीदार लवांडे, मच्छिंद्र वाळके, गजानन गानबोटे, केलास सांळुखे, संदीप राठोड, अतुज साठे, सुजीत पवार, नितीन रावळ, यांनी केली आहे. अधिक तपास पोलीस उप निरीक्षक किरण अडागळे हे करत आहेत.


MH.12NK 5050
MH.12.LN.1273